# मी स्त्री आहे

मी स्त्री आहे
याचा मला अभिमान आहे.
पुरूष माझा सहकारी आहे.
आम्ही दोघे समान आहोत.
हे जग ना त्याचे एकट्याचे,
ना माझ्या एकटीचे
हे जग आम्हा दोघांचे आहे.
ते सुंदर आणि सुखी ठेऊन
पुढच्या पिढीच्या हाती
द्यायचे आहे.

**प्रकाश रेड्डी** (विभागीय समन्वयक, मराठवाडा)
मोबाईल : ९४२१६१४१७०

# बजेट

बाया साऱ्या खस्ता खायला
पुरुष सारे धोरण ठरवायला
**असं का?**
महिला साऱ्या राबराबायला
गडी संमदे नियोजन करायला
**असं का?**
आया बहिणी, कष्ट उपसायला
बापे सारे बजेट बनवायला
**असं का?**

**दत्ता गुरव** (विभागीय समन्वयक, पश्चिम महाराष्ट्र)
मोबाईल : ९८६०३७०७९१

# बयो

**हे बयो,**
परीक्षेला उतरलीस
म्हणून आनंदू नकोस!
या परीक्षा अशा संपणारच नाहीत,
जोवर तुझ्या मानेवरचे जू,
तू भिरकावणारच नाहीस!
**होय बयो,**
अजेंडावर आलीस म्हणून,
नि:श्वास टाकू नकोस,
अजेंड्याचे विषय,
जोवर तू स्वतः ठरविणारच नाहीस
तोवर मनात बंद झालेली चळवळ
पुन्हा रस्त्यावर येणार नाही,
पुन्हा रस्त्यावर येणार नाही!!

**रत्नमाला वैद्य** (विभागीय समन्वयक, नागपूर)
मोबाईल : ९३७१५०२७५१